**भारतीय संविधानाचे अनुच्छेद २७५(१) योजनेअंतर्गत मंजूर "Pragati Abhiyan: To increase yields by comprehensive millets revival, and to include primary processing units for young entrepreneurs; capacity building for various recipes that can be included in ICDS, MDM and Ashram Shala." या योजनेच्या मार्गदर्शक तत्वांना मंजूरी देणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**आदिवासी विकास विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः केंद्रीय-२०१९/प्र.क्र.४७/का-१९**
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
तारीख: ३१/०८/२०१९

**संदर्भ-**

**१.जनजाती कार्य मंत्रालय, नवी दिल्ली यांचे पत्र क्र.F.No.११०१५/०१/२०१९-Grants,दि.११/०३/२०१९**

**२.आदिवासी विकास विभाग,शासन निर्णय क्र.केंद्रिय-२०१९/प्र.क्र.६३/का.१९,दि.२९.०६.२०१९ व दि.२३.०७.२०१९**

**प्रस्तावना-**

केंद्र शासनाकडून विशेष केंद्रीय सहाय्य अंतर्गत अनुदान, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २७५(१) अंतर्गत व अदिम जमाती विकास कार्यक्रम या योजनाअंतर्गत राज्य शासनास अनुदान प्रदान होत असते . या योजनाअंतर्गत प्राप्त होणा-या अनुदानासाठी प्रस्ताव पाठविण्याबाबत प्रकल्प अधिकारी ए.आ.वि.प्रकल्प कार्यालय, अशासकीय/ सामाजिक /खाजगी संस्था यांना आदिवासी विकास विभागाकडून आवाहन करण्यात आलेले होते. यानुषंगाने प्राप्त झालेल्या प्रस्तावांची सविस्तर छाननी व निवड प्रक्रिया राबवून निवडक प्रस्ताव मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील कार्यकारी समितीकडे सादर करण्यात आले.सदर प्रस्तावामध्ये प्रगती अभियान यांचा प्रस्ताव आहे. प्रस्ताव मुख्यत्वे पालघर, नाशिक व ठाणे जिल्ह्यातील आदिवासी क्षेत्रातील हलक्या जमिनीवर घेण्यात येणारे मुख्य पिक नागली /रागी बाबत विकास कार्यक्रम राबवून उत्पन्न वाढ बरोबरच भागातील लोकांची पोषण सुरक्षा वाढविणे या बाबत आहे.

२ नाशिक ,पालघर, रायगड जिल्ह्यातील आदिवासी पट्यात डोंगराळ भागात हलक्या जमिनीत मुख्यत्वे नाचणी/नागली/रागी हे पिक घेतले जातात. नागली हे आदिवासी लोकांच्या आहारातील मुख्य घटक असून आरोग्यासाठी लाभदायी आहे. नागली मध्ये मोठ्या प्रमाणात पोषण तत्व असून कुपोषण कमी करण्यास मदत करते . नागली उत्पादन क्षमता वाढविली तर कुपोषण कमी होण्यास मदत होईल तसेच मध्यान्न भोजन (MDM), अंगणवाडी , आश्रम शाळेत नागलीचे महत्व तसेच विविध पदार्थ या बाबत जनजागृती व मार्गदर्शन केल्यास अन्न सुरक्षा वाढून कुपोषण कमी होण्यास मदत होईल .नागली प्रक्रिया उद्योग स्थापन केल्यास युवकांना रोजगार उपलब्ध होईल ह्या दृष्टीकोनातून प्रगती आभियान यांनी "Pragati Abhiyan: To increase yields by comprehensive millets revival, and to include primary processing units for young entrepreneurs;

capacity building for various recipes that can be included in ICDS, MDM and Ashram Shala" हा रुपये २७०.०० लाख किमतीचा प्रस्ताव नाशिक,पालघर व ठाणे जिल्ह्यातील आदिवासी क्षेत्रात राबविण्याबाबत शासनास सादर केला होता.

३. नागली उत्पादनात वाढ करणे, अंगणवाडी व आश्रम शाळेत नागलीचे महत्व तसेच विविध पदार्थ या बाबत जनजागृती व मार्गदर्शन करून कुपोषण कमी करण्यास मदत करणे, नागली प्रक्रिया उद्योग स्थापन करून युवकांना रोजगार उपलब्ध करून देणे या उद्देशाने आदिवासी विकास विभागाने जनजाती कार्य मंत्रालय भारत सरकार समोर **"Pragati Abhiyan: To increase yields by comprehensive millets revival, and to include primary processing units for young entrepreneurs; capacity building for various recipes that can be included in ICDS, MDM and Ashram Shala"** हि योजना प्रस्तावित केली . या प्रस्तावास जनजाती कार्य मंत्रालयाने दिनांक १२.०२.२०१९ रोजी आयोजीत केलेल्या Project Appraisal Committee (PAC ) बैठकीमध्ये सदर योजना सन २०१९-२० व सन २०२०-२१ करिता राबविण्यासाठी एकूण २७०.०० लक्ष इतक्या रकमेच्या प्रस्तावास संदर्भादिन पत्र क्र.१ अन्वये मंजुरी दिलेली आहे.सदर निधी संदर्भाधिन शासन निर्णयान्वये आयुक्त,आदिवासी विकास,नाशिक यांना वितरित करण्यात आलेला आहे.

४. प्रगती आभियान हि एक ना नफा ना तोटा तत्वावर काम करणारी संस्था आहे. प्रगती आभियान संस्था २००६ मधे स्थापन झाली. आदिवासी-ग्रामीण भागातील असलेल्या गरिबी वर शाश्वत परिणाम करणारे कार्यक्रम लोकांच्या बरोबर राबवणे हे या संस्थेचे उद्दिष्ट आहे.गरिबीवर मात करण्यासाठी सरकारचे अनेक उपक्रम जसे कि मनरेगा, रेशन या संस्थेने गरजुंच्या पर्यंत पोहचवले आहे. ही संस्था गावातील युवकांना योजनांची माहिती देऊन, योजनांचा फायदा शासनाकडुन कसा मिळवयचा याबाबत सातत्याने प्रशिक्षण देत आहे . या योजनांची व्याप्ती व परिणाम समजुन घेण्यासाठी विवीध राष्ट्रीय व परदेशातील विद्यापीठ व संशोधन संस्थांच्या बरोबरही प्रगती अभियानने कामकाज केले आहे . प्रगती अभियान संस्थेने मागिल वर्षी नाशिक जिल्ह्यातील त्रंबकेश्वर,पेठ व इगतपुरी तालुक्यातील ९ गावांमध्ये शंभर एकरावर नागलीच्या उत्पादकता वाढीसाठी प्रयोग केले. अंगणवाडी व आश्रम शाळेत नागलीचे महत्व तसेच विविध पदार्थ या बाबत जनजागृती व मार्गदर्शन केल्यास कुपोषण कमी करण्यास मदत होईल. नागली लागवडी खालील क्षेत्र तसेच उत्पादनात वाढ केल्यास नागली प्रक्रिया उद्योग स्थापन करून युवकांना रोजगार उपलब्ध करून देणे शक्य होईल . सबब, या क्षेत्रामध्ये कामाचा अनुभव असलेल्या संस्थेमार्फत भारतीय संविधान २७५(१) कार्यक्रमा अंतर्गत मंजूर "Pragati Abhiyan: To increase yields by comprehensive millets revival, and to include primary processing units for young entrepreneurs; capacity building for various recipes that can be included in ICDS, MDM and Ashram Shala" हि योजना प्रगती आभियान या संस्थेमार्फत राबविण्याबाबतच्या मार्गदर्शक सूचनांना मंजूरी देण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधिन होता.

**<u>शासन निर्णय-</u>**

नागली उत्पादनात वाढ करणे, अंगणवाडी व आश्रम शाळेत नागलीचे महत्व तसेच विविध पदार्थ या बाबत जनजागृती व मार्गदर्शन करून कुपोषण कमी करण्यास मदत करणे, नागली प्रक्रिया उद्योग स्थापन

करून युवकांना रोजगार उपलब्ध करून देणे या कार्यक्रमार्तंगत “Pragati Abhiyan: To increase yields by comprehensive millets revival, and to include primary processing units for young entrepreneurs; capacity building for various recipes that can be included in ICDS, MDM and Ashram Shala” ही योजना आदिवासी विकास विभाग व प्रगती आभियान नाशिक यांच्यामार्फत संयुक्तपणे राबविण्यासाठी एकुण रु.२७०.०० लक्ष किंमतीच्या अंमलबजावणी मार्गदर्शक सूचनांना या निर्णयाद्वारे सोबत जोडलेल्या परिशिष्ट क्रमांक१ नुसार मंजूरी प्रदान करण्यात येत आहे.

२. सदर योजनेच्या मार्गदर्शक सूचनांनुसार वितरीत तरतूदींच्या मर्यादेत योजना राबविण्याबाबत त्वरीत कार्यवाही आयुक्त, आदिवासी विकास ,नाशिक यांनी करावी व त्याचे उपयोगिता प्रमाणपत्र आर्थिक व भौतिक अहवालासह शासनास सादर करण्याची दक्षता घ्यावी.

३. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०८३११५५०५०५४२४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Santosh Shivaji Jadhav

Digitally signed by Santosh Shivaji Jadhav
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Tribal Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=1f635bf4a671627c02b82e6a01acb4a38afc24f58a5534a9d1271fe258a564b0, serialNumber=b8ee819ccc335cea98640b72c63671dd013899d3601f09ce4ea340e1741652a0, cn=Santosh Shivaji Jadhav
Date: 2019.08.31 15:57:33 +05'30'

**( संतोष जाधव )**
**कार्यासन अधिकारी**

**प्रत,**

१) मा.मंत्री आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, यांचे खाजगी सचिव ,मंत्रालय,मुंबई
२) मा.राज्यमंत्री आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
३) स्वीय सहायक,मा. सचिव,आदिवासी विकास,मंत्रालय,मुंबई
४) आयुक्त,आदिवासी विकास,महाराष्ट्र राज्य,नाशिक.
५) सहसचिव,आदिवासी विकास विभाग,मंत्रालय,मुंबई.
६) उपसचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
७) अपर आयुक्त, आदिवासी विकास नाशिक व ठाणे .
८) प्रकल्प अधिकारी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प नाशिक ,कळवण,शहापूर व जव्हार
९) प्रतिनिधी, प्रगती अभियान, नाशिक
१०) संगणक समन्वयक,आदिवासी विकास विभाग,मंत्रालय,मुंबई
११) निवड नस्ती (का.१९) आदिवासी विकास विभाग,मंत्रालय,मुंबई.

**भारतीय संविधान अनुच्छेद २७५(१) अंतर्गत मंजूर योजना- सन २०१९-२०**

**परिशिष्ट-१** **(रुपये लाखात)**

<table>
<tr><td>१</td><td>योजनेचे नाव</td><td>“Pragati Abhiyan: To increase yields by comprehensive millets revival, and to include primary processing units for young entrepreneurs; capacity building for various recipes that can be included in ICDS, MDM and Ashram Shala”</td></tr>
<tr><td>२</td><td>योजनेचे प्रस्तावित लाभ क्षेत्र</td><td>एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय नाशिक,कळवण,शहापूर व जव्हार यांचे कार्यक्षेत्र.
<table>
<tr><th>अ. क्र</th><th>प्रकल्प कार्यालय</th><th>प्रस्तावित तालुके</th><th>एकूण गावे</th><th>एकूण क्षेत्र (एकर)</th><th>लाभार्थी संख्या (अंदाजे)</th></tr>
<tr><td rowspan="2">१</td><td rowspan="2">नाशिक</td><td>त्र्यंबकेश्वर</td><td>५</td><td>१००</td><td>१५०</td></tr>
<tr><td>पेठ</td><td>५</td><td>१००</td><td>१५०</td></tr>
<tr><td>३</td><td>कळवण</td><td>सुरगाणा</td><td>५</td><td>१००</td><td>१५०</td></tr>
<tr><td>४</td><td>शहापूर</td><td>शहापूर</td><td>५</td><td>१००</td><td>१५०</td></tr>
<tr><td>५</td><td>जव्हार</td><td>मोखडा</td><td>५</td><td>१००</td><td>१५०</td></tr>
<tr><td colspan="3">एकूण</td><td>२५</td><td>५००</td><td>७५०</td></tr>
</table>
सदर लाभार्थी कार्यक्षेत्रामध्ये आवश्यकतेनुसार बदल कण्याचे अधिकार शासनास असतील.</td></tr>
<tr><td>३</td><td>वित्तीय तरतूद</td><td>
<table>
<tr><th>क्र</th><th>वर्ष</th><th>योजना</th><th>निधी (रू.लक्ष)</th></tr>
<tr><td>१</td><td>२०१९-२०</td><td>Pragati Abhiyan: To increase yields by comprehensive millets revival, and to include primary processing units for young entrepreneurs; capacity building for various recipes that can be included in ICDS, MDM and Ashram Shala.</td><td>१३५.००</td></tr>
<tr><td>२</td><td>२०२०-२१</td><td>Pragati Abhiyan: To increase yields by comprehensive millets revival, and to include primary processing units for young entrepreneurs; capacity building for various recipes that can be included in ICDS, MDM and Ashram Shala.</td><td>१३५.००</td></tr>
<tr><td colspan="3">एकूण</td><td>२७०.००</td></tr>
</table></td></tr>
</table>

| | | |
|---|---|---|
| ४ | **या योजनेत येणारे खर्चाचे अंदाजपत्रक** | **एकूण खर्च -रु.२७०.०० लक्ष**<br>**लाभार्थींची संख्या-७५० (अंदाजे)**<br>**सन २०१९-२० एकूण खर्च- १,३०,४१,००० /-** |

| **अ.क्र** | **बाब** | **युनिट** | **प्रती युनिट खर्च** | **एकूण खर्च** |
|---|---|---|---|---|
| अ | उत्पादन क्षमता वाढविणे | | | |
| अ१ | सामुदायिक बियाणे केंद्र स्थापन करणे | २५ ग्रामपंचायत | ७५,०००/- | १८,७५,००० /- |
| अ२ | सामुदायिक वस्तु केंद्र community Hiring Centers | २५ ग्रामपंचायत | ९०,०००/- | २२,५०,००० /- |
| ब | पुर्नसंचयीत करणे | | | |
| ब १ | प्रायोजिक तत्वावर नागली/ रागी वर आधारित विविध पाककृतीची ओळख करून देणे | २५ ग्रामपंचायत | ५००० | १,२५,०००/- |
| ब२ | नागली व इतर भरडधान्येचा वापर बाबत मोहीम राबविणे | ५ ग्रामपंचायत | १०००० | ५०,०००/- |
| क | ICE मटेरिअल तयार करणे | २५ ग्रामपंचायत | ५००० | १,२५,०००/- |
| ड | प्रक्रिया युनिट उभारणे | | | |
| ड१ | De-Huller,Destoner हार्वेस्टर | ५ तालुके | ३५०००० | १७,५०,०००/- |
| ड२ | फ्लोअर मिल,पुल्वेरायझर | २ ग्रामपंचायत | १,५०,००० | ३,००,०००/- |
| इ | संसाधन व्यक्ती (CRP) | १० व्यक्ती | १,५०,००० (प्रती व्यक्ती प्रती वर्ष खर्च) | १५,००,००० /- |
| ई | क्षमता बांधणी | २५ ग्रामपंचायती | | १२,६०,००० /- |
| उ | प्रकल्प खर्च | | | ३४,०६,००० /- |
| ऊ | तांत्रिक सहाय्य खर्च | | | ४,००,००० /- |
| | | | एकूण | १,३०,४१,००० /- |

**सन २०२०-२१ एकूण खर्च -रू.१,३९,५९,०००/-**

| अ.क्र | बाब | युनिट | प्रती युनिट खर्च | एकूण खर्च |
|---|---|---|---|---|
| अ | उत्पादन क्षमता वाढविणे | | | |
| अ१ | सामुदायिक बियाणे केंद्र स्थापन करणे | २५ ग्रामपंचायत | ७५,०००/- | १८,७५,००० /- |
| अ२ | सामुदायिक वस्तु केंद्र community Hiring Centers | २५ ग्रामपंचायत | ९०,०००/- | २२,५०,००० /- |
| ब | पुनर्संचयीत करणे | | | |
| ब १ | प्रायोजिक तत्वावर नागली/ रागी /नाचणी वर आधारित विविध पाककृतीची ओळख करून देणे | २५ ग्रामपंचायत | ५००० | १,२५,०००/- |
| ब२ | नागली /नाचणी/व इतर मिलेट चा वापर बाबत मोहीम राबविणे | ५ ग्रामपंचायत | १०००० | ५०,०००/- |
| क | IC E मटेरिअल तयार करणे | २५ ग्रामपंचायत | ५००० | १,२५,०००/- |
| ड | प्रक्रिया युनिट उभारणे | | | |
| ड१ | De-Huller,Destoner हार्वेस्टर | ५ तालुके | ३५०००० | १७,५०,०००/- |
| ड२ | फ्लोअर मिल,पुल्वेरायझर | ५ ग्रामपंचायत | १५०००० | ७,५०,०००/- |
| इ | संसाधन व्यक्ती (CRP) | १० व्यक्ती | १,५०,००० | १५,००,००० /- |
| ई | क्षमता बांधणी | ग्रामपंचायत | | १४,६८,००० /- |
| उ | प्रकल्प खर्च | | | ३६,६६,००० /- |
| ऊ | तांत्रिक सहाय्य खर्च | | | ४,००,००० /- |
| | | | एकूण | १,३९,५९,००० /- |

**एकूण खर्च - प्रथम वर्ष खर्च + द्वितीय वर्ष खर्च**

**= १,३०,४१,००० + १,३९,५९,०००**

**= २,७०,००,०००/-**

| | | |
|---|---|---|
| ५ | **योजना राबवणारी यंत्रणा** | प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय नाशिक,कळवण,शहापूर व जव्हार व प्रगती अभियान संस्था |
| ६ | **नियंत्रक अधिकारी** | अपर आयुक्त, आदिवासी विकास ठाणे व नाशिक |
| ७ | **योजनेचा उद्देश/ हेतु** | नागली उत्पादनात वाढ करणे, अंगणवाडी व आश्रम शाळेत नागलीचे महत्व तसेच विविध पदार्थ या बाबत जनजागृती व मार्गदर्शन करून कुपोषण कमी करण्यास मदत करणे, नागली प्रक्रिया उद्योग स्थापन करून युवकांना/महिलांना रोजगार उपलब्ध करून देणे. |
| ८ | **योजना अंमलबजावणीची कार्यपध्दती** | **योजना राबविण्याची कार्य पद्धती खालील प्रमाणे असेल**<br>१) सदर योजनेच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने प्रगती आभियान हि संस्था अंमलबजावणी यंत्रणा म्हणून कामकाज करेल.<br>२) योजनेच्या अनुषंगाने ए.आ.वि.प्रकल्प नाशिक यांच्या कार्यक्षेत्रामध्ये १० गावे तसेच कळवण, शहापूर व जव्हार यांच्या कार्यक्षेत्राअंतर्गत प्रत्येकी ५ -५ गावांची अशा एकूण २५ गावांची निवड केली जाईल . सदर कार्यक्षेत्रामध्ये आवश्यकतेनुसार बदल करण्याचे अधिकार शासनास असतील.<br>३) प्रत्येक गावातून २० एकर असे एकूण ५०० एकर क्षेत्रावर नागलीची लागवड व प्रयोगअंमलबजावणी यंत्रणा करेल.<br>४) जमिन व पाणी उपलब्धतता असलेल्या आश्रमशाळांमध्येही योजना राबविली जाईल.<br>५) ज्या गावांमध्ये नागली हे पिक मोठ्या प्रमाणात घेतले जाते अशा गावांची निवड अंमलबजावणी करणारी यंत्रणा करेल .<br>६) गावांची निवड करताना प्राधान्याने पेसा गावांची व आश्रमशाळांच्या आसपास असलेल्या गावांची निवड करावी किंवा वनहक्क कायद्याअंतर्गत जमीन प्राप्त झालेल्या गावांची निवड करावी .<br>७) प्रत्येक गावामधून लाभार्थी शेतकऱ्यांची निवड अंमलबजावणी यंत्रणा करेल .<br>८) गावांची व लाभार्थ्यांची निवड झाल्यानंतर अंमलबजावणी यंत्रणेनी गावांची यादी व लाभार्थ्याची यादी सबंधित प्रकल्प अधिकाऱ्याला सादर करावी .<br>**लाभार्थी शेतकऱ्याची निवड करण्यासाठी पुढील बाबींचा विचार करावा .**<br>अ) लाभार्थी हा अनुसूचित जमातीचा असावा<br>आ) लाभार्थी हा नागलीची शेती करणारा असावा<br>इ) दारिद्र्य रेषेखालील शेतकऱ्याला प्राधान्य देण्यात यावे<br>ई) महिला,विधवा शेतकऱ्यांचा समावेश करावा.<br>८.निवड केलेल्या शेतकऱ्यांची प्राथमिक व शेतीविषयक माहिती अंमलबजावणी यंत्रणा जमा करेल (पायाभूत सर्वेक्षण) निवड केलेल्या शेतकऱ्यांना अंमलबजावणी यंत्रणा सुरुवातीला सदर योजनेचा उद्देश , करावयाच्या बाबी या बाबत माहिती देतील . |

| | | |
|---|---|---|
| | | ९.निवड केलेल्या शेतकऱ्यांना अंमलबजावणी यंत्रणेमार्फत वेळोवेळी नागलीची शाश्वत शेती करण्याबाबत प्रशिक्षण दिले जाईल.<br>१०.अंमलबजावणी यंत्रणा शेतकऱ्यांसाठी नागलीची लागवड, बी बियाणे , बियाणे प्रक्रिया, लागवडीची पद्धत ,तन नियंत्रण , रोग-कीड नियंत्रण, पिकाचे पोषण, पिक काढणी, प्रक्रिया व विपणन , प्रती एकर उत्पन्न वाढ या बाबत प्रशिक्षण साहित्य तयार करेल.<br>**११.सामुदायिक बीज पद्धत-** योजनेच्या अनुशंगाने सामुदायिक बीज पद्धत संकल्पनेची ओळखव स्थापना अंमलबजावणी यंत्रणेमार्फत २५ ग्रामपंचायतीमध्ये करून दिली जाईल . ज्या शेतकऱ्यांकडे चांगल्या प्रतीचे बियाणे उपलब्ध असेल अशा शेतकऱ्यांकडून बीज एकत्र केले जाईल व त्याचा लागवडीसाठी वापर केला जाईल.<br>**१२.सामुदायिक केंद्र** (Community hiring center)- योजनेच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने २५ ग्रामपंचायतीच्या ठिकाणी सामुदायिक केंद्र (Community hiring center) स्थापन केले जाईल. सामुदायिक केंद्रामध्ये शेतकऱ्यांना आवश्यक असणारी विविध उपकरणे जसे कि सायकल विडर, स्प्रे पंप ,ड्रम, डीझेल इंजिन ,पाईप व इतर आवश्यक साहित्य ठेवले जाईल जेणेकरून आवश्यकतेनुसार गावातील शेतकरी याचा वापर करू शकतील .सामुदायिक केंद्र हे स्थानिक शेतकऱ्यांच्या मार्फत चालविले जाईल. सामुदायिक केंद्र उभारण्यासाठी अंमलबजावणी यंत्रणा मदत करेल<br>**१३.प्रक्रिया केंद्र -** योजनेच्या अनुषंगाने अंमलबजावणीयंत्राने मार्फत प्रकल्पातील ठराविक ठिकाणी नागली/मिलेट वर स्थानिक प्रक्रिया उद्योग सुरु करण्यासाठी गावातील युवक/महिला गटांची बांधणी केली जाईल व त्यांना त्या संबंधी प्रशिक्षण दिले जाईल तसेच प्रकिया केंद्र स्थापन केले जाईल . सदर प्रक्रिया केंद्राची मालकी हि सबंधित गटाच्या नावाने असेल. सदर गटाची निवड करण्याची जबाबदरी हि अंमलबजावणी यंत्रणेची राहील. गटाची निवड करताना गट हा मुख्यत्वे नागली उत्पादक असावा हि काळजी अंमलबजावणी यांत्रणेनी घ्यावी .<br>**१४.नागली /रागी व इतर भरडधान्याबाबत जनजागृती तसेच पाककृती बाबत प्रशिक्षण -** योजनेच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने अमलबजावणी यंत्रणा प्रकल्पातील अंगणवाडी सेविका , शाळेतील/ आश्रम शाळेतील शिक्षक/कर्मचारी यांना नागलीचे पौष्टीक पदार्थ तयार करणे , नागलीचे आहारातील महत्व या बाबत मार्गदर्शन करतील जेणेकरून अंगणवाडी ,आश्रम शाळा , मध्यान्य भोजनामध्ये नागली व इतर मिलेट च वापर वाढेल<br>१५.योजनेच्या अनुषंगाने अंमलबजावणी यंत्रणा जनजागृती साठी IEC साधनांची निर्मिती करतील व योजनेच्या अनुषंगाने निवडलेल्या गावांमध्ये जनजागृती करतील . |

| | | |
|---|---|---|
| ९ | **योजनेच्या अटी व शर्ती** | १) योजना विहित वेळेत पूर्ण करण्याची जबाबदारी अंमलबजावणी करणाऱ्या संस्थेची असेल.<br>२) योजनेच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने आऊट सोर्सिंग करण्याची जबाबदारी अंमलबजावणी यंत्रणेची राहिल.<br>३) प्रकल्पामध्ये होणाऱ्या बदलाची पूर्वकल्पना प्रकल्प अधिकारी व सनियंत्रण व मूल्यमापन समितीला देऊन समितीच्या मान्यतेनेच बदल करावा.<br>४) प्रकल्प राबवितांना आवश्यक असणारे प्रशिक्षण/कार्यशाळा व प्रात्यक्षिके संस्थेद्वारे देणे बंधनकारक असेल.<br>५) योजनेच्या अनुषंगाने ठराविक ठिकाणी नागली संबंधी प्रक्रिया केंद्र उभारण्याची जबाबदारी अंमलबजावणी यंत्रणेची राहील.<br>६) योजनेच्या प्रगतीबाबत माहिती वेळोवेळी प्रकल्प अधिकाऱ्यांना तसेच शासनास सादर करण्याची जबाबदारी अंमलबजावणी यंत्रणेची राहील.<br>७) अंमलबजावणी करणाऱ्या संस्थेला केलेल्या कामाचा पूर्तता अहवाल व उपयोगिता प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक असेल.<br>८) सदर योजनेची अंमलबजावणी करताना चलचित्र (video) व छायाचित्रे काढावीत व योजनेची अंमलबजावणी पुर्ण झाल्यानंतर योजनेचा फलनिष्पत्ती अहवाल शासनास सादर करण्याची जबाबदारी प्रकल्प अधिकारी व अंमल बजावणी यंत्रणा यांची राहील तसेच लाभार्थ्यांची यादी व Geo-tagged photographs हे www.stcmis.gov.in/smis या वेबसाईट वर अपलोड करण्याची जबाबदारी प्रकल्प अधिकारी यांची राहील.<br>९) योजनेच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने योजनेच्या प्रगती बाबत माहिती वेळोवेळी CAS पोर्टल वर भरण्याची जबाबदारी अंमलबजावणी यंत्रणेची असेल. |
| १० | **सनियंत्रण व मूल्यमापन समिती** | **योजनेचे संनियंत्रण व मुल्यमापना करीता प्रकल्प निहाय पुढीलप्रमाणे समिती गठीत करण्यात येत आहे.**<br>१. सबंधित प्रकल्प अधिकारी,ए.आ.वि.प्रकल्प - **अध्यक्ष**<br>२. सबंधित तालुका कृषी अधिकारी -**सदस्य**<br>३ . प्रगती अभियान संस्था , प्रतिनिधी - **सदस्य**<br>४.सबंधित सहायक प्रकल्प अधिकारी,ए.आ.वि.प्रकल्प -**सदस्य सचिव**<br>➢ योजनेच्या अंमल बजावणीच्या अनुषंगाने करण्यात येणारे कार्य व त्याची प्रगती या बाबत अहवाल शासनास / आयुक्त, आदिवासी विकास,नाशिक यांना सादर करण्याची जबाबदारी उपरोक्त समितीस असतील<br>➢ योजनेची अंमलबजावणी सुरू झाल्यापासून उपरोक्त समितीची बैठक दर ३ महीन्यांनी आयोजित करावी व सदर बैठकीमध्ये योजनेच्या प्रगतीचा आढावा घेण्यात याव तसेच योजना अंमबलजावणीमध्ये काही अडचणी असतील तर त्याबाबत आवश्यक कार्यवाही करावी. |

| | | |
|---|---|---|
| | | **सदर योजनेसाठी पुढील प्रमाणे मुल्यमापन व सनियंत्रण समिती प्रस्तावित करण्यात आहे .**<br><br>१. आयुक्त,आदिवासी विकास,नाशिक - **अध्यक्ष**<br>२.संबंधित अपर आयुक्त,आदिवासी विकास - **सदस्य**<br>३.सबंधित प्रकल्प अधिकारी,ए.आ.वि.प्रकल्प - **सदस्य**<br>४. सबंधित जिल्हा कृषी अधिकारी - - **सदस्य**<br>५.संबंधित जिल्हा महिला बाल कल्याण अधिकारी - **सदस्य**<br>५ . संचालक ,प्रगती अभियान संस्था - **सदस्य**<br>६.कृषी विषयातील तज्ञ - **निमंत्रित सदस्य**<br>७. सहायक आयुक्त ( केंद्रिय निधी) ,आयुक्तालय - **सदस्य सचिव**<br><br>➢ योजनेच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने करण्यात येणारे कार्य व त्याची प्रगती या बाबत अहवाल शासनास सादर करण्याची जबाबदारी उपरोक्त समितीस असतील<br>➢ योजनेची अंमलबजावणी सुरू झाल्यापासून उपरोक्त समितीची बैठक दर ६ महीन्यांनी आयोजित करावी व सदर बैठकीमध्ये योजनेच्या प्रगतीचा आढावा घेण्यात याव तसेच योजना अंमबलजावणीमध्ये काही अडचणी असतील तर त्याबाबत मार्गदर्शन करावे. |
| ११ | **योजनेच्या अंमलबजावणीचा कालावधी** | शासन निर्णय निर्गमित झाल्यापासून २ वर्ष |
| १२ | **निधी वितरणाची कार्य पद्धती** | **सदर योजनेकरिता निधी वितरणाची कार्यपद्धती खालील प्रकारे निश्चित करण्यात येत आहे.**<br>१) योजनेच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने मंजूर झालेल्या रकमेच्या मर्यादेत खर्च करण्याची जबाबदारी अमलबजावणी यंत्रणेची असेल. योजनेसाठी इतर कोणताही अतिरिक्त निधी उपलब्ध करून दिला जाणार नाही याची दक्षता अंमलबजावणी यंत्रणेनी घ्यावी.<br>२) सदर योजनेचा निधी हा आयुक्त,आदिवासी विकास नाशिक यांच्या मार्फत अंमलबजावणी यंत्रणेला वर्ग करण्यात येईल<br>३) शासन निर्णय निर्गमित झाल्यानंतर आयुक्त,आदिवासी विकास ,नाशिक हे अंमलबजावणी यंत्रणेला कार्यारंभ आदेश देऊन प्रकल्पासाठी पहिल्या वर्षासाठी मंजूर रकमेतून ५० टक्के रक्कम अदा करतील .<br>४) सदर निधी प्राप्त होताच व कार्यारंभ आदेश मिळाल्यानंतर अंमलबजावणी यंत्रणा प्रत्यक्षात कार्यास सुरुवात करेल . |

| | | |
|---|---|---|
| | | ५) प्रत्यक्ष कार्य सुरु होऊन ०६ महिने झाल्यानंतर व कामाच्या प्रगतीनुसार व मूल्यमापन व सनियंत्रण समितीच्या अहवालानुसार व समाधानकारक शिफारस केल्यानंतर पहिल्या वर्षाची पुढील ४० टक्के निधी वर्ग करण्यात येईल.<br>६) योजनेच्या अंमलबजावणीचे एक वर्ष पूर्ण झाल्यानंतर व त्याबाबतचा अहवाल सादर केल्यानंतर पहिल्या वर्षाचा उर्वरित १० टक्के निधी अंमलबजावणी यंत्रणेला वर्ग करण्यात येईल .<br>७) योजनेच्या अनुषंगाने दुसऱ्या वर्षाच्या मंजूर निधीच्या ४० टक्के निधी दुसऱ्या वर्षाची अंमलबजावणी सुरु होण्यापूर्वी तसेच प्रथम वर्षी केलेल्या कामाच्या प्रगतीनुसार व मूल्यमापन व सनियंत्रण समितीच्या शिफारशीनुसार वर्ग करण्यात येईल .<br>८) दुसऱ्या वर्षाचा पुढील ४० टक्के निधी ६ महिने पूर्ण झाल्यानंतर कामाच्या प्रगतीनुसार व मूल्यमापन व सनियंत्रण समितीच्या शिफारशीनुसार वर्ग करण्यात येईल.<br>९) दुसऱ्या वर्षासाठी मंजूर झालेल्या निधीतून उर्वरित २० टक्के निधी योजना यशस्वीरीत्या पूर्ण झाल्या नंतर तसेच कार्य पूर्णता प्रमाणपत्र सदर केल्या नंतर मूल्यमापन व सनियंत्रण समितीच्या अभिप्राय नुसार अंमलबजावणी यंत्रणेस वर्ग केला जाईल .<br>१०) योजनेच्या अनुषंगाने आऊट सोर्सिंग करण्यात येणारे कर्मचारी यांचे मानधन देण्याची संपूर्ण जबाबदारी अंमलबजावणी यंत्रणेची राहील .<br>११) योजनेच्या अनुषंगाने झालेल्या खर्चाचा अहवाल वेळोवेळी आयुक्त,आदिवासी विकास नाशिक तसेच सबंधित प्रकल्प अधिकारी यांना सादर करण्याची जबाबदारी अंमल बजावणी यंत्रणेची राहील. |
| १३ | **योजनेची फलनिष्पती** | नागली उत्पादनात वाढ , अंगणवाडी, आश्रम शाळा/माध्यमिक शाळामध्ये मध्यान्ह भोजनामध्ये नागलीच्या पदार्थांचा वापर तसेच नागली प्रक्रिया उद्योग स्थापन होऊन युवकांना/महिलांना रोजगार उपलब्ध होईल . |